सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून १९९७.

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १०९४/प्र. क्र. ८/९४/१२.---भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या बृहन्मुंबई बाहेरील कार्यालयातील "स्वीय सहायक गट ब", "उच्चश्रेणी लघुलेखक- गट ब", "निम्नश्रेणी लघुलेखक-गट-ब" व "लघुटंकलेखक गट-क" या पदांच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :---

१. या नियमांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयातील "स्वीय सहायक-गट-ब" "उच्चश्रेणी लघुलेखक-गट ब", "निम्नश्रेणी लघुलेखक- गट ब" आणि "लघुटंकलेखक-गट- क" पदांचे (सेवाप्रवेश) नियम, १९९७, असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर---

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन असा आहे,

(ब) "शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र" म्हणजे शासकीय परीक्षा मंडळाचे, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले प्रमाणपत्र आणि शासनाने ह्या उद्देशांसाठी जिला मान्यता दिलेली आहे, अशी अन्य कोणतीही संस्था, यांनी दिलेले प्रमाणपत्र, असा आहे,

(क) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (महा. एक्स. एल. आय. १९६५) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र आणि या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.

३. उच्चश्रेणी लघुलेखक, या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तिची "जेष्ठता अधिन पात्रता" या निकषावर "स्वीय सहायक" पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

४. उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.---

(अ) निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि नामनिर्देशनाने भरतीसाठी या नियमाच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित केल्यानुसार लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाने शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तींची, "जेष्ठता अधिन पात्रता" या निकषावर पदोन्नतीने नेमणूक करता येईल,

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने---

(१) ज्या व्यक्तीचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि तीस वर्षांपेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(३) जी व्यक्ति लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

५. निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.—

(अ) लघुटंकलेखक या पदावर किमान तीन वर्षाची नियमित सेवा पूर्ण केली असेल. आणि या नियमांच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तिची "जेष्ठता अधिन पात्रता" या निकषावर पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने,

(१) ज्या व्यक्तिचे वय अठरा वर्षापेक्षा कमी नाही आणि तीस वर्षापेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तीचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि

(३) जी व्यक्ति लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

६. लघुटंकलेखक या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल.—

(अ) लिपिक टंकलेखक या पदावर किमान तीन वर्षाची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि या नियमाच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित केल्यानुसार लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा व्यक्तिची "जेष्ठता अधिन पात्रता" या निकषावर या पदी पदोन्नतीने नेमणूक करता येईल.

परंतु लिपिक-टंकलेखक या संवर्गाच्या पदोन्नती साखळीतील पदोन्नती सोडून देण्याच्या विकल्पाची ज्या टंकलेखकांनी निवड केली आहे, त्या टंकलेखकांचा सुद्धा त्यांच्या आपापसातील ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.

किंवा

(ब) पुढील व्यक्तिमधून नामनिर्देशनाने,

(१) ज्या व्यक्तिचे वय अठरा वर्षापेक्षा कमी नाही, आणि तीस वर्षापेक्षा जास्त नाही,

(२) ज्या व्यक्तिने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि



(३) जो व्यक्ती लघुलेखनाचा वेग किमान ८० शब्द प्रति मिनिट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट, या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असेल.

७. नियम ४, ५ आणि ६ येथे नमूद केलेल्या पदांवरील नेमणूका पदोन्नती आणि नामनिर्देशनाने ५० : ५० या प्रमाणात करण्यात येतील.

८. उपरोल्लेखित कोणत्याही पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तिला, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा त्या संबंधी केलेल्या नियमांनुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

९. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेची निकड लक्षात घेऊन, वरील नियम ७ अन्वये नामनिर्देशनाने भरतीसाठी जे प्रमाण विहित केले आहे, ते शिथिल करावे, असे शासनाच्या मते आवश्यक वाटल्यास, सदरहू प्रमाण शिथिल करून शासनास उपरोल्लेखित पदांवर नेमणूक करता येऊ शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
सह सचिव.

क्रमांक आरटीआर. १०९४/प्र. क्र. ८/९४/बारा,

सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २४ जून १९९७

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे, औरंगाबाद/नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/ठाणे,

*प्रोथोनोटरी आणि सिनिअर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

*पत्राने.

म. स. पवार,
अवर सचिव.